प्रसिध्दी पत्रक　　　　दिनांक : ०३/०९/२०२३

# महानगरपालिकेचे लिपिक काठीकर यांनी अनाधिकृत बांधकाम पाडण्याची भीती दाखवुन २०,०००/— रूपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. इतवारा गुरनं २८५/२०२३ कलम ७, ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०३.०९.२०२३ रोजी ०३.१३ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) गिरीश चिंताहरी काठीकर, वय ५२ वर्षे, पद — लिपीक, स्थानिक संस्था कर व अतिरिक्त कार्यभार क्षेत्रीय कार्यालय क्र. ४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, वजिराबाद, नांदेड<br>२) खाजगी ईसम मिर्झा अफजल बेग पि. शमशोद्दीन बेग, वय ५४ वर्षे, व्यवसाय —ट्रान्सपोर्ट, रा. गुलजार बाग, गल्ली नं. ०८, टिपु सुलतान रोड, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | २०,०००/— रूपये |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांनी स्वत: चे व त्यांचे भावाचे मालकीचे जागेत टीन शेड उभे करून त्यामध्ये कापड दुकान चालवत आहेत. दि.२७/०८/२०२३ रोजी रविवारी शासकीय सुट्टी असताना सुध्दा महानगरपालिकेचा कर्मचारी येवून त्यांचे बांधकामाची मोजणी करून गेला व जाताना उदया दि. २८/०८/२०२३ रोजी त्यांचे महात्मा गांधी पुतळ्याजवळील महानगरपालिकेच्या कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार हे दि. २८/०८/२०२३ रोजी त्यांचे कार्यालयात जावून मोजणी केलेल्या कर्मचा—यास जावून भेटले असता, त्याने तुमचे काम काठीकर साहेब यांच्याकडे असून, तेच तुमचे काम करणार आहेत असे सांगितले. तेव्हा तक्रारदार हे लिपिक काठीकर यांना भेटले असता, त्यांनी तुमचे बांधकाम महानगरपालिकेची परवानगी न घेता चोरून केले आहे. सदरचे बांधकाम पाडून टाकावे लागेल आणि तुम्हाला दिड लाख रुपयाचा दंड लागेल असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी साहेब बांधकाम पाडू नका, पाहिजे तर टॅक्स वाढवा अशी विनंती केली. तेव्हा लिपिक काठीकर यांनी या कामाचे मला वेगळे २०,०००/— रू. द्यावे लागतील असे सांगितले. लिपिक काठीकर यांनी मागणी केलेले २०,०००/— रूपये ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे त्याबाबत तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कडून दि. ०२/०९/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना शासकीय पंचासमक्ष यातील खाजगी ईसम अफजल याने तुमचे काम ४० ते ४५ हजाराचे असून काठीकर साहेब फक्त २०,०००/— रूपयामध्ये करून देत आहेत. त्यामुळे आताच सांगा असे म्हणून आलोसे काठीकर यांना लाच देण्यास खाजगी इसम अफझल याने प्रोत्साहन दिले. तेव्हा यातील आलोसे लिपिक काठीकर यांनी आता मला फोन लावायचा नाही, अफजलकडे २०,०००/— रूपये देवून टाका अशी शासकीय पंचासमक्ष पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केली.<br>यातील आलोसे लिपिक काठीकर यांनी तक्रारदार यांना त्यांचे अनाधिकृत बांधकाम पाडण्याची भिती दाखवून शासकीय पंचासमक्ष लाचेची मागणी केली व दि. ०२/०९/२०२३ रोजी यातील खाजगी ईसम मिर्जा अफजल बेग याच्या मार्फतीने २०,०००/— रूपयाची लाच स्विकारली म्हणुन त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन ईतवारा, जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक,यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक श्री अरविंदकुमार हिंगोले, श्री गजानन बोडके, श्री कालीदास ढवळे, सपोउपनि श्री मांजरमकर, पोह/शेख रसुल, पोना/राजेश राठोड, पोकॉ/सयद खदीर, चापोह/गजानन राऊत, चापोना/निळकंठ यमुनवाड, चापोना/प्रकाश मामुलवार सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्री प्रशांत पवार पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड

| | |
|---|---|
| संपर्क कमांक :— 02462—253512 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| टोल फ्री कमांक— 1064 | |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई—मेल आयडी | ई—मेल आयडी |
| spacbnanded@mahapolice.gov.in | dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |

INSTAGRAM- acb_nanded


पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner